**मराठी वाड्:मय मंडळ सन २०२२-२०२३ च्या आयोजित झालेल्या कार्यक्रमाचा अहवाल**

शंकर नारायण कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी वाड्:मय मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो. दि. ८ऑगस्ट, २०२२ रोजी "मराठी विषयात करिअरच्या संधी" या विषयावर प्रा. आदित्य देसाई यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. दि. १३ ऑगस्ट २०२२ रोजी रांगोळी कार्यशाळेचे आयोजन करून चित्रकार चित्रगंधा सुतार ( जे जे आर्ट ऑफ स्कूल) च्या प्रशिक्षकांकडून रांगोळी कलेसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. दि. १५ डिसेंबर २०२२ रोजी " महिला सक्षमीकरण आणि सुरक्षा " या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत पोलीस उपनिरीक्षक तेजश्री शिंदे व श्री. तुकाराम सकुंडे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मोलाचे ठरले. दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत " मराठी भाषा संवर्धन पंधरवडा " या कार्यक्रमामार्फत विविध स्पर्धा आयोजित करण्यात आले. या सर्व स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.

दि. २३जानेवारी २०२३रोजी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाने आयोजित करण्यात आलेल्या " कुमार विश्वकोश स्वरूप व व्याप्ती " या व्याख्यानमालेत डॉ. होमी भाभा वैज्ञानिक संशोधन मंडळाचे अधिकारी श्री. विजय लाळे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. दि. २८ फेब्रुवारी २०२३रोजी " मराठी भाषा दिनानिमित्त " "काव्यकुसुमांजली" या कार्यक्रमात मराठी साहित्यातील ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रजांच्या विविध कवितांचे काव्यगायन विद्यार्थ्यांनी सादर केले.

मराठी साहित्याशी संबंधित विविध प्रकारचे उपक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मराठी वाड्:मय मंडळ सदैव कार्यतत्पर असते. सादर करण्यात आलेल्या प्रत्येक कार्यक्रमाचे वृत्त वर्तमानपत्रात छापील रूपात दिले जाते.

प्रा. रुचिता राणे
मराठी विभाग